सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५४ | मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

# पालिकेतील सर्व सभांचे लाईव्ह प्रक्षेपण व्हावे

## नगरसेवकांची नगराध्यक्ष, मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेची सभा मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या सर्व सभांच्या कामकाजाचे व्हिडिओ शूटिंग व्हावे, बाहेर कर्मचारी व नागरिकांसाठी स्क्रीन लावला जावा, केबल टीव्हीच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण व्हावे व पत्रकारांना सभागृहात स्थान मिळावे, अशी मागणी नगरसेवक-नगरसेविकांनी निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदन नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी निवेदन



देण्यात आले आहे.



त्यात म्हटले आहे, की पालिकेच्या विविध सभांच्या कामकाजांबाबत सर्वसामान्य नागरिकांना खूप उत्सुकता व आकर्षण आहे. आपली लोकाभिमुखता व पारदर्शकता प्रतीत होण्यासाठी आपण कृपया आपल्या विविध सभांच्या कामकाजाचे व्हिडिओ शूटिंग करून तो डाटा सेव्ह ठेवावा. पालिकेबाहेर मोठा स्क्रीन लावून कर्मचारी व नागरिकांना त्याचे थेट प्रक्षेपण दिसेल अशी व्यवस्था करावी. तसेच केबल टीव्हीच्या माध्यमातून संपूर्ण शहरातही थेट प्रक्षेपण दिसावे. जेणेकरून आपण नागरिकांच्या हिताचे काय निर्णय करीत आहोत? काय चर्चा करीत आहोत ? हे सारे दृश्यस्वरूपात सर्वांना दिसेल. तसेच शहरात पत्रकारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे सर्वांनाच सभागृहात बातमी कव्हर करण्यासाठी प्रवेश देणे शक्य नाही, हे आम्ही जाणून आहोत. त्यामुळे पत्रकारांच्या प्रत्येक संघटनेच्या किमान दोन सदस्यांना सर्व सभांच्या बातम्या कव्हर करण्यासाठी सभागृहात सन्मानपूर्वक परवानगी देण्यात यावी. पत्रकारांची ही संख्या जास्तीत जास्त सहा ते आठ असेल. इतक्या पत्रकारांना आपण सभागृहात सहज स्थान देऊ शकतो. कृपया आमच्या या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देऊन मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ च्या सभेपासूनच यातील जास्तीत जास्त बाबींचा प्रारंभ करावा. टप्प्या-टप्प्याने आमच्या सर्वच मागण्यांसदर्भातील विनंतीप्रमाणे सारे काही सुरू करावे.

निवेदनावर सौ. जयश्रीताई अनिल पाटील, डॉ. डिगंबर विठ्ठल महाले, भरतकुमार सुरेश ललवाणी, सचिन विभाकर कासार, देवेंद्र भानुदास कांबळे, प्रवीण गंगाराम पाटील, सौ. नंदा नरेंद्र संदानशिव, सौ. स्वप्ना विक्रांत पाटील, सौ. जुबेदाबी नसिरोद्दीन, सौ. कविता विजय राजपूत, सौ. अफसाना मुक्तार खाटीक, सौ. योगिता सयाजीराव कापडणेकर, सौ. शोभाबाई भिवसन गढरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



पाडसे (ता. अमळनेर) : अपघातांना निमंत्रण ठरू पाहणारी रस्त्यावर पसरलेली रेती. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# रस्त्यावर पसरलेल्या रेतीमुळे अपघातांचा धोका वाढला

## गलवाडे-पाडसे रस्त्यावरील स्थिती; प्रवासी त्रस्त

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील गलवाडे ते पाडसे मार्गावर गावांमध्ये घराच्या बांधकामासाठी साठवून ठेवलेली रेती थेट रस्त्यावर येत आहे. परिणामी वाहने घसरून मोठ्या अपघाताची शक्यता आहे. रस्त्यावर पसरलेली रेती अपघातांना निमंत्रण ठरत आहे. संबंधितांनी याबाबत काळजी घ्यावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

गलवाडे- नरडाणा हा रस्ता वर्दळीचा रस्ता आहे. मात्र, या रस्त्यावरील अनेक गावातील ग्रामस्थांनी रस्त्याच्या कडेला ठेवलेली रेती व मुरूम मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर पसरते. विशेषतः वळणाच्या मार्गावर दुचाकी वाहनांसाठी घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. रस्त्याचा बराचसा भाग मुरूमाच्या ढिगाऱ्यांनी व्यापलेला दिसून येतो. गलवाडे गावाजवळील कॉर्नर धोकेदायक गलवाडे गावाच्या वळणावर परिस्थिती अधिक धोकादायक झाली आहे. मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूंनी सुमारे तीन-तीन फूटपर्यंत वाळू व मातीचे थर साचलेले दिसतात. त्यामुळे हा रस्ता अरुंद झला आहे. त्यामुळे किरकोळ अपघात होत आहेत.

धुळीचे प्रमाण वाढले रस्त्यावर पसरलेल्या रेती- मुरूमामुळे मोठ्या प्रमाणात धुळही उडते. वाहनचालकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पर्यायी मार्गामुळे वाढली वाहतूक गलवाडे मार्गे पुढे बेटावद, नरडाणा, शिंदखेडा, शिरपूरकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी प्रमुख मार्ग आहे. झाडी मार्गावरील रेल्वे बोगद्याची उंची कमी आहे. तसेच या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे मोठ्या व अवजड वाहनांची वाहतूक सध्या पाडसे मार्गावरून वळविली जात आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहतुकीचा ताण अधिक वाढला आहे.

**रेती, मुरुम रस्त्यावरून हटवावेत**

या रस्त्यावरील साठवलेली रेती व मुरूम तात्काळ हटवावेत. वाहतूक सुरळीत व सुरक्षित करण्यासाठी नियमित स्वच्छता मोहीम राबवावी. अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने त्वरित संबंधितांवर कारवाई करावी. अन्यथा भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# अमळनेर पंचायत समितीच्या इमारतीचे काम अंतीम टप्प्यात

## दहा कोटींतून साकारताहेत सुसज्ज दालने

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : येथील धुळे रस्त्यावरील महाराणा प्रताप चौकातील जुन्या शासकीय विश्रामगृहाच्या जागेवर नवीन व सुसज्ज अशा पंचायत समितीच्या नवीन इमारतीचे काम सुरू आहे. हे काम आता अंतीम टप्प्यात आहे. आमदार अनिलदादा पाटील यांनी या इमारतीच्या कामासाठी सुमारे १० कोटींचा निधी मंजूर करून आणला होता. या इमारतीत सर्व सुविधायुक्त सुसज्ज दालने साकारले जात आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून युद्धपातळीवर या नवीन इमारतीचे काम सुरू आहे. ही इमारत दुमजली असून हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या तीन महिन्यात इमारतीचे काम पूर्ण होणार आहे. या इमारतीत शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता, कृषी, महिला व बालविकास यासह अन्य सर्व विभागासाठी स्वतंत्र मोठे हॉल, त्याचबरोबर सभापती, उपसभापती व गटविकास अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र दालनाची व्यवस्था आहे. याशिवाय आधुनिक सोयी सुविधा असलेला बैठक हॉल, तसेच अभ्यागतांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा रूम आहे. याशिवाय स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था, रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी सुविधा असतील.

# मुलींची छेड काढल्याने तरुणाविरुद्ध गुन्हा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालय परिसरात अनधिकृतपणे प्रवेश करून विद्यार्थिनींची छेडखानी केल्याप्रकरणी साहील पठाण या तरुणाविरूद्ध येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना शनिवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी घडली होती.

पोलिसांनी सांगितले, की साहील पठाण हा तरुण प्रताप महाविद्यालयाच्या कार्यालयाबाहेर विद्यार्थिनींशी मैत्री करण्याच्या उद्देशाने गोंधळ घालत होता. त्यामुळे मोठा वाद सुरू होता. हा गोंधळ ऐकून प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांच्यासह काही प्राध्यापक बाहेर आले. हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान, एका एस. वाय. बी. एस्सी. च्या विद्यार्थिनीने प्राचार्यांकडे तक्रार दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना पाचारण करण्यात आले आले. साहिल पठाण याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२९ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

हेडकॉन्स्टेबल अशोक साळुंखे करीत आहेत. साहील पठाण याविरूद्ध पुण्यातील एका एनसीसी कॅडेटला गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याचा गुन्हाही दाखल असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

# संयम, नियोजन आणि सातत्यच यशाची गुरुकिल्ली

## प्रांताधिकारी मयूर भंगाळे : साने गुरुजी ग्रंथालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी वेळ, संयम आणि कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. लगेच यश मिळेल अशी अपेक्षा ठेवू नका. अभ्यासाचे योग्य नियोजन करा आणि प्रत्येक विषयाच्या नोट्स स्वतः तयार करा. नोट्स तयार करताना विषय अधिक स्पष्ट होतो आणि लक्षातही राहतो. संयम, नियोजन आणि सातत्यच यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी केले.

येथील पूज्य साने गुरुजी ग्रंथालय मोफत वाचनालय संचलित साने गुरुजी स्पर्धा परीक्षा केंद्रात नुकत्याच झालेल्या मार्गदर्शन सत्रात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. साने गुरुजी वाचनालयाचे संचालक तथा पत्रकार ईश्वर महाजन अध्यक्षस्थानी होते. श्रमसाफल्य अभ्यासिका वर्गाचे संचालक के. एल. पाटील, जिजाऊ अभ्यासिका केंद्राचे संचालक विशाल घिसाडी व्यासपीठावर उपस्थित होते.







अमळनेर : स्पर्धा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मयूर भंगाळे. व्यासपीठावर ईश्वर महाजन व मान्यवर. समोर उपस्थित विद्यार्थी.

प्रांताधिकारी भंगाळे पुढे म्हणाले, की परीक्षेच्या क्लुप्त्या जाणून घेणे, बारीकसारीक प्रश्न समजून घेणे आणि वेळेचे काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक आहे. दिवसभरात आपण किती वेळ वाया घालवतो याचा आढावा घ्यावा. सोशल मीडियापासून दूर राहा. मी स्वतः दोन वर्षे मोबाईलपासून दूर राहिलो, तेव्हाच मला यश मिळाले.

(पान २ वर)

आजचे अभीष्टचिंतन





श्री. नरेश रणधीर
पोलीस अधिकारी



श्री. दिनेशआप्पा सोनवणे
महसूल विभाग



श्री. सुभाषभैया अग्रवाल
माजी नगरसेवक



श्री. भैयासाहेब मगर
साई इंग्लिश ॲकॅडमी, अमळनेर

**भारताचा मोठा पराभव; सेमी फायनलची वाट कठीण**

(पान २ वर...)

## दिनविशेष

२४ फेब्रुवारी

- केंद्रीय उत्पाद शुल्क दिवस
- कर्मचारी राज्य विमा योजना (ईएसआयसी) सुरू झाली.
- सरकारने मद्रास राज्याचे नाव बदलून तामिळनाडू करण्याचा निर्णय घेतला.
- सचिन तेंडुलकर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात द्विशतक झळकावणारा पहिला खेळाडू बनला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# मुला-मुलींचे लग्नाचे वाढते वय

आपल्याकडे लग्नाला एक पवित्र बंधन समजले जाते. सध्याच्या धावपळीच्या जीवनात कुणाला साधी एकमेकांची विचारपूस करण्याची फुरसत नसते. तरुण पिढी तर सोशल मीडियाच्या जाळ्यात पूर्णतः अडकलेली आहे. हल्ली आणखी एक समस्या समाजात मोठ्या प्रमाणात दिसून येते आणि ती म्हणजे तरुण-तरुणींचे लग्नाचे वाढते वय. हल्लीची पिढी हुशार आहे. त्यामुळे स्वबळावर काहीतरी चांगले करून दाखविण्याची त्यांची धडपड असते. हल्लीच्या मुलीही खूप शिकतात. त्यामुळे त्या वेल सेटल्ड होतपर्यंत लग्नाला तयार होत नाहीत. मुलांचीही तीच अवस्था असते. चांगली नोकरी मिळेपर्यंत किंवा व्यवसायात जम बसेपर्यंत ते लग्न करायला तयार नसतात. पूर्वीपेक्षा आजच्या जीवनात स्पर्धेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे चांगले जीवन जगताना घर, पैसा, गाडी असावी असे प्रत्येकाला वाटते. त्यासाठी वेळ हवा म्हणूनही लग्नाचे वय वाढत चालले आहे. हल्ली मुले-मुली करिअरला जास्त प्राधान्य देतात. विवाहास विलंब होणे आज एक सामाजिक समस्या झालेली आहे. मुले-मुली उच्च शिक्षण घेतात. करिअरचा विचार करताना लग्नाचे वय बऱ्याचदा निघून जाते. पहिले आई-वडील म्हणतील त्या मुलाशी किंवा मुलीशी लग्न लावून दिले जायचे. आता परिस्थिती बदलली आहे. हल्ली मुले-मुली पहिले आवडी-निवडी जुळतात का ते बघतात. त्यासोबतच कोण किती सॅलरी कमावतो तेही बघितले जाते. जर दोघांनाही पटले तरच मग लग्नाचा विचार केला जातो, असेही चित्र बऱ्याचदा पाहायला मिळते. पूर्वी मुलीला स्वयंपाक येतो का? घरकाम येते का? हे पाहिले जायचे. मुलाला चांगली नोकरी आहे का? घरदार आहे का? अशा मोजक्या गोष्टी पाहिल्या जायच्या. मात्र आता मुला-मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत. आता मुलांना कमावणारी मुलगी हवी असते. मुलींनाही घरकामात मदत करणारा मुलगा हवा असतो. त्यासाठी मुले-मुली वाट बघतात. त्यामुळेही लग्नाचे वय वाढत जाते. अनेक मुलींना त्यांच्यापेक्षा कमी पगार असणारा मुलगा नवरा म्हणून नको असतो. जोपर्यंत त्यांना त्यांच्या मनाजोगा मुलगा मिळत नाही तोपर्यंत त्या लग्न करत नाही, ही खरी परिस्थिती आहे. उगाच वय वाढवत बसण्यापेक्षा आलेले स्थळ उत्तम असेल तर लग्न करण्यास काहीच हरकत नाही. मुलींचे लग्न वेळेत न होण्यासाठी कधी-कधी मुलींच्या आई-वडिलांचा अहंकार आडवा येतो. मुलाचा पगार, शिक्षण, बँक बॅलन्स इत्यादी गोष्टींची तुलना मुलीच्या पगाराशी, दिसण्याशी केली जाते आणि चांगल्या मुलांना नकार दिला जातो. मुलींप्रमाणे मुलांच्याही अपेक्षा असतात. मुलगी सुंदर, सुस्वभावी, उच्चशिक्षित असावी अशी बहुतेक मुलांची अपेक्षा असते. काही मुलांना उच्चशिक्षित बायको घरी राहणारी हवी असते. बऱ्याचदा ही गोष्ट मुलगी आणि तिच्या घरचे लोक मान्य करीत नाही. मुला-मुलींच्या अवाजवी अपेक्षांमुळे दोघांचेही लग्नाचे वय वाढत जाते.

काही मुले कमी शिकलेली असतात. साहजिकच त्यांना चांगल्या पगाराची नोकरी मिळत नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी मुलगी शोधताना खूप अडचणी येतात. मग हळूहळू मुलाचे लग्नाचे वय वाढत जाते. मोठ्या शहरात राहणाऱ्या मुलींना छोट्या शहरातील मुलगा नको असतो. त्या मोठ्या शहरांतून लहान शहरात जायला तयार होत नाहीत. जिथे फक्त पैसा पाहून लग्न केले जाते तिथे सांगणे कठीण असते की त्या जोडप्याचे पुढील आयुष्यात सूर जुळतील किंवा नाही. मग कित्येकदा त्यांच्यात खटके उडायला लागतात. मुलींचा शिकण्याकडे कल वाढल्याने त्यांचे लग्नाचे वय आपोआपच वाढत जाते. आता मुली शिक्षणाने मुलांच्या बरोबरीत आल्याने त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता आली आहे. त्या आपली मते परखडपणे मांडतात. आजची तरुण पिढी उशिरा लग्न करीत असल्याने त्यांच्या आजी-आजोबा होण्याच्या वयात ते आई-बाप होतात. काही मुले-मुली लग्न करतच नाहीत. कारण एक तर त्यांचे लग्नाचे वय निघून गेलेले असते किंवा त्यांना कुठेतरी त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य धोक्यात येण्याची भीती वाटत असते. समाजात मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा कमी आहे. त्यामुळे साहजिकच त्यांच्या अपेक्षा वाढतात. याची कित्येक उदाहरणे आपल्याला आजूबाजूला दिसत असतात. हल्ली तर मुले काय किंवा मुली काय, बहुतेक वेळा वयाची तिशी पार केल्यानंतर लग्न करतात. शेवटी समाजव्यवस्था टिकविण्यासाठी विवाहाचे बंधन आवश्यक आहे. विवाह जमवणे सोपी गोष्ट नाही. लग्न म्हणजे एकमेकांना समजून घेणे, जीवनातील परिस्थितीशी जुळवून घेणे असते. जी मुले-मुली ही गोष्ट समजून घेतात त्यांचे संसार निश्चितच चांगले होतील यात शंका नाही. समाजात आज कित्येक मुले-मुली अविवाहित आहेत. एकतर त्यांचे लग्नाचे वय झालेले असतानाही लग्न जुळत नाही किंवा लग्नाचे वय निघून गेलेले असते. त्यामुळे त्यांना लग्न करण्याची इच्छा उरत नाही. हल्ली तर परिस्थिती अशी झाली आहे, की मुलींपेक्षा मुलांचे लग्न जुळवताना मुलांच्या आई-वडिलांच्या अगदी नाकीनऊ येते. याला कारण म्हणजे आता मुली खूप शिकतात, स्वतःच्या पायावर उभ्या होतात आणि त्यामुळे त्यांच्या होणाऱ्या नवऱ्याकडून भरपूर अपेक्षा असतात. अपेक्षा करणे चुकीचे नाही, पण अवास्तव अपेक्षा करणे चुकीचे आहे.

माझ्याच जवळच्या नात्यात तीन मुली अशा आहेत ज्या उच्चशिक्षित आणि कमावत्या आहेत, पण त्यांच्या आणि मुलींच्या आई-वडिलांच्या मुलाकडून खूप अपेक्षा असल्याने आज त्यांचे वय ३५-४० झाले असतानाही त्यांचे लग्न झालेले नाही आणि आता लग्न होण्याची शक्यताही मावळली आहे. असेच सुरू राहिले तर कदाचित पुढे जाऊन लग्नपद्धत बंद होईल की काय, अशी शंका येते. याचा परिणाम असा होईल की जास्तीत जास्त मुले-मुली लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये राहायला लागतील. यामुळे समाजात चुकीचा संदेश जाऊन सामाजिक स्वास्थ्य खराब होत आहे. माणसाच्या आयुष्यात पैसा महत्वाचा आहेच यात काही शंका नाही, पण फक्त पैशाच्या मागे लागून सांसारिक सुखाला वंचित राहायचे याला काय अर्थ आहे? फक्त पैसा, गाडी, बंगला म्हणजेच सर्वकाही नाही याची जाणीव प्रत्येकानेच ठेवायला पाहिजे. कधी-कधी मुलीला मुलापेक्षा जास्त पगार आहे म्हणून इतर सर्व बाबी व्यवस्थित असतानाही स्थळ नाकारले जाते. फक्त पगार बघण्यापेक्षा मुलाचा स्वभाव जर चांगला असेल, तो निर्व्यसनी असेल तर अशा मुलाशी लग्न करण्यास काहीच हरकत नाही. आपण सहसा लग्न जुळवताना मुलगा आणि मुलगी यांची कुंडली बघून किती गुण जुळतात ते बघतो. पण अशी अनेक जोडपी आहेत ज्यांचे ३६ पैकी ३६ गुण जुळूनही ते संसारात दुःखी आहेत. मुले-मुली शिक्षण आणि त्यानंतर नोकरी करीत असताना त्यांचे वय तसेही वाढलेले असते. त्यातही जर असे स्थळ नको, तसेच हवे असे करत राहिले तर चार-पाच वर्षे अशीच निघून जातात. या जगात कुणीही परफेक्ट नाही. लग्न म्हटले की कुठेतरी तडजोड करावीच लागते. फक्त मी म्हणेन तसेच व्हावे असे संसारात होत नाही. त्यासाठी नवरा-बायकोने एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे. नाहीतर घटस्फोट हा होणारच!

# शिवकालीन ऐतिहासिक दिनविशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

### २२ फेब्रुवारी १६६५

छत्रपती शिवरायांनी कर्नाटकातील 'कारवार' जिंकले. छत्रपती शिवरायांचा कारवारच्या खाडीच्या तोंडाशी मुक्काम होता. येथे शेरखानने इंग्रज व तेथील सर्व व्यापाऱ्यांकडून मोठी रक्कम जमवून ती नजराण्याच्या स्वरूपात छत्रपती शिवरायांच्या समोर रूजू केली.

### २२ फेब्रुवारी १६८४

केग्विनने २२ फेब्रुवारी १६८४ रोजी पुन्हा इंग्लडच्या राजाला पत्र पाठवून छत्रपती संभाजीराजांनी आपल्या सरहद्दीवर ३० हजार सैन्य मुंबईपासून तीन मैलांवर असणाऱ्या पलतात (पलते ) या बेटावर उतरवून ते बेट व्यापण्याचा प्रयत्न केल्याचे कळवले होते. केग्विन हा सातत्याने चार्लस राजाला छत्रपती संभाजी महाराजांच्या शक्तीची व आक्रमक धोरणाची कल्पना यासाठी देत होता की, जेणे करुन छत्रपती संभाजी महाराजांशी तह करुन सलोखा निर्माण व्हावा. त्याप्रमाणे एप्रिल १६८४ पूर्वी केग्विनने तहाच्या बोलणीसाठी कॅप्टन गॅरी, थॉमस विल्किन्स , राम शेणवी यांना तहाच्या बोलणीसाठी छत्रपती संभाजी महाराजांच्याकडे पाठवले त्यांनी बिरवाडी येथे राजांची भेट घेतली व गर्व्हनर केग्विनला पत्र पाठवून उभयंतामध्ये होणाऱ्या तहाच्या अटींना संमती दर्शवली होती.

### २२ फेब्रुवारी १६९८

जिंजीवरून निघताना सुरक्षिततेसाठी छत्रपती राजाराम महाराजांनी खंडो बल्लाळ ह्याच्या मार्फत जिंजीच्या वेढ्यातील गणोजी शिर्के ह्यास दाभोळच्या वतना बदल्यात आपल्याकडे वळवले. २६ डिसेंबर १६९७ रोजी वेढ्यातून बाहेर पडल्यावर महाराज व इतर वीस पुरुष बुरखा घालून शिरक्यांच्या महिलांच्या पालखीत बसले व गणोजीच्या तळावर आले. त्यांनतर दुसऱ्या दिवशी शिरक्यांनी शिकारीचा मामला सांगून आपल्या काही माणसांबरोबर महाराज, येसाजी दाभाडे हे व इतर पुरुषास शिकारीचा वेष परिधान करून



छावणीतून बाहेर काढले. मार्गात जलतगतीने मार्गक्रमण करत असताना येसाजी दभाडेचा प्रवासातील दगदग सहन न होऊन मृत्यू झाला. शिरक्यांनी महाराजांना पुढे रणीच्या किल्ल्याच्या आसमंतात लपून असलेल्या धनाजी जाधव यांच्या फौजेकडे सुपूर्द केले. मागाहून गिरजोजी यादव राजस्त्रियांना घेऊन आला. ह्या सर्व मामल्यास झुल्फिकार खानाची गुप्त संमती होती. तरीही या प्रकरणात गणोजी शिर्के ह्यास छावणीत अटक झाली होती. वल्लोर-कोप्पळ-भुदरगड असा परतीचा प्रवास करत राज कुटुंब सोबत महाराज २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशाळगडावर पोहचले.

### २२ फेब्रुवारी १७३९

सन १७३९ च्या सुरुवातीला मराठ्यांनी धारावी माहीम काबीज केल्यानंतर खंडोजी माणकर व तुबाजीपंत यांजवर धारावी काबीज करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. चिमाजीअप्पांनी तुबाजीस मुर्ध्यावर मोर्चा बसविण्यास आज्ञा केली. तुबाजीपंतांचा मुर्ध्यावर दिनांक २२ फेब्रुवारी सन १७३९ मोर्चा कायम झाला. इतक्यात पोर्तुगीजांनी त्यावर हल्ला केला. तुबाजीपंताच्या फौजेने पोर्तुगीजांचा हल्ला निकराने परतविला. इतकेच नाही तर दिनांक २६ फेब्रुवारी सन १७३९ रोजी गायमुखावर तुबाजीपंतांनी मोर्चा बसविला. धारावी किल्यात पाण्याची सोय नाही. गायमुख मराठ्यांनी काबीज केल्याने पोर्तुगीजांचे पाणी तुटले. पोर्तुगीजांनी पुन्हा गायमुखावर हल्ला केला तोही मराठ्यांनी परतवून लावला. दिनांक २७ फेब्रुवारी सन १७३९ रोजी चिमाजीअप्पांनी शत्रूच्या आरमारावर गायमुख येधून हल्ला करण्यास हुकूम दिला. त्यानुसार रामजी महादेव, तुबाजीपंत व आंग्रे यांनी मारा सुरू केला.

### २२ फेब्रुवारी १८७९

वासुदेव बळवंतांनी पुणे, नगर, नासिक या टापूत पायी प्रवास करून लोकांची विपन्नावस्था पाहिली. या दुष्काळास, दारिद्र्यास परकीय सरकार जबाबदार आहे, त्याची हकालपट्टी करून आपल्या लोकांचे शासन स्थापन केले पाहिजे, असा प्रचार त्यांनी सुरू केला. एकाच वेळी सर्व ठिकाणी उठाव व्हावेत, अशी त्यांची इच्छा होती; पण तसे साथीदार त्यांना मिळाले नाहीत. शिवाय पांढरपेशा सुशिक्षित वर्गात त्यांना पाठिंबा मिळेना; तेव्हा मागासवर्गातील रामोशी, धनगर अशांकडे ते वळले आणि स्वतःच्या नेतृत्वाखाली त्यांनी ही मोहीम हाती घेतली. पुण्याजवळील लोणीकंद येथे बंडवाल्यांचे मुख्य कार्यालय स्थापन करण्यात आले. सरकारी खजिने, सावकार, बनिये यांच्यावर धाडी घालण्याच्या योजना आखण्यात आल्या. शासनाची नाकेबंदी करण्यासाठी रेल्वे, तुरुंग, तार आणि टपाल कचेऱ्या उद्ध्वस्त करण्याचे ठरले. २२ फेब्रुवारी १८७९ रोजी सायंकाळी रामोशांच्या मोठ्या जमावाला जेवण घालण्यात येऊन कोणास चांदीचे कडे, तर कोणास शेलापागोटे, कोणा च्या हातावर पाच-दहा रुपये ठेवण्यात आले आणि जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड उभारल्याचे जाहीर करण्यात आले. पुढील पाच आठवडे या बंडखोरांनी धामारी, दावडी, वाल्हे, हर्णे, सोनापूर, चांदखेड आदी सह्याद्रीच्या कुशीतील गावे लुटली. सावकार लुटून पैसा उभारावयाचा आणि नव्या टोळ्या उभारून सरकारला 'त्राही भगवन' करून सोडावयाचे, असा वासुदेव बळवंतांचा विचार होता. ▲

# श्री मंगळग्रह मंदिर परिसरात 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत स्वच्छता

## संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे १५० वर सेवकांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संत निरंकारी मिशन अंतर्गत संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत चौथ्या टप्प्यात येथील श्री मंगळग्रह मंदिरात रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या संकल्पनेतून प्रेरित या अभियानात जवळपास १५० वर सेवकांनी सहभाग नोंदवून परिसर स्वच्छ केला. सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आशीर्वादाने आणि बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.



*अमळनेर : संत निरंकारी मिशन अंतर्गत संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत रविवारी श्री मंगळग्रह मंदिर परिसरात राबविलेले स्वच्छता अभियान.*

पर्यावरण संरक्षणाबरोबरच समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यात सेवकांनी श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील प्लास्टिक कचरा, साचलेली घाण, इतर टाकाऊ वस्तू गोळा करून संपूर्ण परिसर स्वच्छ केला. यात शाखाप्रमुख श्रीचंद निरंकारी, सेवादल इन्चार्ज जितेंद्र डिंगराई आणि निरंकारी सेवादल यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी या उपक्रमाचे कौतुक करत संबंधित सेवकांसाठी अल्पोपहार व चहाची व्यवस्था केली. तसेच संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या या अभिनव उपक्रमाला मंगलमय शुभेच्छाही दिल्या. ▲

# भाजप किसान मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी श्रीनिवास मोरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील आर्डी येथील भाजपचे कार्यकर्ते श्रीनिवास केशव मोरे यांची भाजप जळगाव पश्चिम जिल्ह्याच्या किसान मोर्चा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांनी ही नियुक्ती केली आहे.

श्रीनिवास मोरे यांच्या नियुक्तीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. संघटनेचे प्रतिनिधी म्हणून आपण सरकार व जनता यामधील दुवा बनून, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारच्या लोककल्याणकारी योजना, पक्षाचे ध्येय धोरण जनमानसांत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे श्री. मोरे यांनी सांगितले. ▲

# बटाटे लवकर सडतात? मोड येऊ नये म्हणून करा 'हा' सोपा उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात बटाटे आणले की काही दिवसांतच त्यांना मोड येणे, हिरवे-काळे डाग पडणे किंवा ते मऊ होणे ही समस्या अनेकांना भेडसावते. पण परडीत फक्त 'या' साध्या वस्तू ठेवल्यास बटाटे महिनाभर ताजे राहू शकतात.

भारतीय स्वयंपाकघर बटाट्याशिवाय अपूर्ण आहे. बटाटा हा एक असा जिन्नस आहे जो प्रत्येक पदार्थात वापरला जातो. बटाटा वापरून तुम्ही अनेक पदार्थ बनवू शकता. त्यामुळे बटाटे मोठ्या प्रमाणात घरात उपलब्ध असतात. मात्र, पावसाळा किंवा उन्हाळ्यात बटाटे सडतात. त्याला मोड येणे, हिरवे डाग पडणे किंवा ते मऊ होणे, असे काही ना काही होते आणि अखेर ते वापरण्यायोग्य राहत नाहीत. केवळ एक सोपी गोष्ट बटाट्यांचे आयुष्यमान वाढवू शकते. एक असा पारंपरिक देशी उपाय, जो आपल्या आजी-आजोबांनी करून पाहिला आहे आणि जो आजही तितकाच प्रभावी आहे. तो म्हणजे परडीत बटाटे ठेवावेत. ▲



# संयम, नियोजन आणि सातत्यच यशाची गुरुकिल्ली

पान १ वरून ....

पुण्यासारख्या शहरात वेळ वाया जात असल्याचे लक्षात आल्यावर मी कानळदा या गावातच पूर्णपणे अभ्यासासाठी झोकून दिले. सलग तीन वर्षे यूपीएससी परीक्षेत अपयश आले, तरी निराश न होता सातत्य ठेवले आणि अखेर २०२३ मध्ये यश संपादन केले. प्रश्न विचारणारी पिढी घडली पाहिजे. जोपर्यंत तुम्ही प्रश्न विचारत नाही, तोपर्यंत तुमच्या शंकांचे निरसन होणार नाही. अभ्यास केल्याशिवाय प्रश्न निर्माण होत नाहीत. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना कुटुंबाचा विश्वास जिंकणे, आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवणे आणि त्यागाची भावना जोपासणे आवश्यक आहे. नियोजनाशिवाय यश नाही. लक्ष्य निश्चित करा आणि त्यासाठी झोकून द्या. ईश्वर महाजन म्हणाले, की ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, त्या क्षेत्रात स्वतःला पूर्णपणे झोकून द्या. मेहनतीशिवाय पर्याय नाही. सातत्य, प्रामाणिकपणा आणि ध्येयवेडेपणामुळेच यशाची शिखरे गाठता येतात. दरम्यान, प्रारंभी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. साने गुरुजी ग्रंथालय मोफत वाचनालय संचलित स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक विजयसिंह पवार यांनी प्रास्ताविक केले. कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अमेय आचार्य यांचा सत्कार करण्यात आला.

## टी-२० वर्ल्डकप

# भारताचा मोठा पराभव; सेमी फायनलची वाट कठीण

## फक्त दोन विजय पुरेसे नाहीत तर आता संघाला...; कसे आहे समीकरण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारताला पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने यजमानांना तब्बल ७६ धावांनी पराभूत केला. यासह सुपर-८ मोहिमेची भारतासाठी अत्यंत निराशाजनक सुरुवात झाली. या मोठ्या पराभवामुळे उपांत्य फेरीत पोहोचण्याच्या भारताच्या आशांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अजून दोन सामने बाकी असताना टीम इंडियाकडे आता चूकही करण्याची अजिबात संधी उरलेली नाही. शिवाय, त्यांच्या नेट रनरेटवरही मोठा परिणाम झाला आहे.

दक्षिण आफ्रिकेने या सामन्याक नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारताने सुरूवातीला उत्कृष्ट गोलंदाजी करत क्विंटन डी कॉक, एडन मारक्रम आणि रायन रिकल्टन यांना पहिल्या पाच षटकांत माघारी धाडले. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेची अवस्था २० धावांत ३ बाद अशी झाली होती. मात्र त्यानंतर डेव्हिड मिलर आणि डेवाल्ड ब्रेविस यांनी आक्रमक फलंदाजी करत प्रतिहल्ला चढवला आणि भारताला बचावात्मक भूमिकेत ढकललं. या भागीदारीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने १८५ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात भारताची वरची फळी पूर्णपणे कोसळली आणि संघाची अवस्था ५१ धावांत ५ बाद अशी झाली.

पॉवरप्लेमध्येच भारताने ३ विकेट्स गमावल्या आणि त्यानंतर ५१ धावांत ५ अशी अवस्था झाल्यानंतर भारतीय संघ सामन्यात पुनरागमन करू शकला नाही. एकट्या शिवम दुबेने ४२ धावांची खेळी केली, पण त्याला साथ न मिळाल्याने संघ सामन्यात झुंजही देऊ शकला नाही आणि परिणामी फक्त १११ धावांवर सर्वबाद झाला आणि सामना मोठ्या फरकाने गमावला. यामुळे आता भारताचा नेट रन रेट वजामध्ये गेला आहे. ▲

### भारत उपांत्य फेरीत कसा पोहोचू शकतो?

भारत सध्या 'करो या मरो' अशा स्थितीत आहे. सुपर-८ मधील कमीत कमी २ सामने जिंकत संघ सुपर-८ गाठू शकतो. पण भारताची सुरूवात इतकी वाईट झाली आहे की त्यांना आता एक चूकही पुढे करून चालणार नाही. भारताचा पुढील सामना गुरुवारी २६ फेब्रुवारीला चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर झिम्बाब्वेविरुद्ध होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या फेरीतील अखेरच्या सामन्यात रविवारी २७ फेब्रुवारीला कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजशी सामना रंगणार आहे.

भारताला केवळ स्वतःचे दोन्ही सामने जिंकणे पुरेसे ठरणार नाही, तर दक्षिण आफ्रिकेने झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांना पराभूत करणे हेदेखील गरजेचे असणार आहे. अन्यथा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होऊ शकते. जर मारक्रमच्या संघ झिम्बाब्वे-वेस्ट इंडिज सामन्यात पराभूत झाला, तर भारताने दोन विजय मिळवूनही उपांत्य फेरीचे समीकरण अवघड होऊ शकते, कारण तीन संघ चार गुणांवर बरोबरीत येऊ शकतात.

अशा परिस्थितीत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघाला केवळ विजयच नव्हे, तर मोठ्या फरकाने विजय मिळविणे आवश्यक ठरेल, जेणेकरून नेट रनरेट सुधारता येईल आणि पुढील फेरीचे तिकीट निश्चित करता येईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मराठ्यांचे कुळपुरुष छत्रपती शिवाजी महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दारा शुकोह.. उदारमतवादी. अकबराने सर्व धर्म एकत्र आणून नव्या धर्माची निर्मिती केली. जहांगीर आणि शाह जहानने जरी अकबराचे धोरण पूर्णपणे स्वीकारले नसले, तरीही त्याने तयार केलेल्या धार्मिक संरचनेला फारसा धक्का लावला नाही. ज्याची परिणीती म्हणजे, जहांगीरचा पुत्र खुसरो आणि शाह जहानपुत्र दारा यांचे उदारमतवादी असणे.. पण दारा जरी गंगा जमना तहजीबच्या गप्पा मारत असला तरीही तो अतिशय उतावीळ, उद्धट, गर्विष्ठ होता.. राजकीय डावपेचांच्या आणि माणूस पारखण्याच्या बाबतीत इतर भावांपेक्षा बराच कमकुवत निघाला.

“अबुल फैज नसिरुद्दीन मुहम्मद तैमुर (तिसरा) सिकंदर (दुसरा) शाह शुजा बहादूर गाझी”.. शुजा.. आजच्या बांगलादेश, पश्चिम बंगाल आणि बिहार प्रांतावर साधारण पंधरा वर्षांपेक्षा जास्त सुभेदार म्हणून नियुक्त असल्यामुळे प्रचंड प्रशासकीय आणि लष्करी अनुभव होता. पण त्याच्या कारकिर्दीकडे, विशेषतः अखेरच्या चारपाच वर्षात त्याच्या निर्णयाकडे बघितलं की लक्षात येते, त्याचे अविचारी धाडस आणि उतावळेपणाची भूमिका..

“मउव्वाजउद्दीन मुहम्मद मुराद बक्ष गाझी बहादूर”.. आपल्या ‘लाडक्या’ भावाला, औरंगजेबाला हाताशी धरून मुघल साम्राज्याची वाटणी करण्याचे ठरवले पण उतावीळपणे औरंगजेबाच्या विरोधात कारस्थान करण्यास सुरूवात केली..आपल्याच साम्राज्यातील वैभवशाली नगरीची, सुरतेची लूट करणारा एकमेव राजपुत्र.. मदिरा त्याची कमजोरी होती. दारूच्या एवढ्या आहारी गेला होता, की स्वतः शाह जहानला ‘अली नकी’ नामक एका व्यक्तीची खास नियुक्ती करावी लागली.. मुरादची काळजी घ्यायला नाही, तर त्याची दारू कमी करायला.. याच अली नकीच्या विरोधात मुरादच्या गोटातील लोकांनी मुराद चे कान भरले, मुरादने या नकीचा खून केला.. असा हा व्यसनाच्या प्रचंड आहारी गेलेला मुराद.. आणि याचाच पुरेपूर फायदा उचलून औरंगजेबाने याला बरोबर बाजूला केले..

“अबुल मुजफ्फर मूहिउद्दीन मुहम्मद औरंगझेब आलमगीर गाझी बहादूर पातशाह”.. औरंगजेब आलमगीर..



महत्त्वाकांक्षी, बेरकी राजकारणी, धूर्त, कट्टर धार्मिक धोरणाचा राजकारणात पुरेपूर वापर करणारा पण वडिलांना अटक करणारा, भावांची निर्घुणहत्या करणारा ‘पिदरगीर’.. प्रचंड संशयी, हेकेखोर, निर्दयी, टोकाचे शत्रुत्व जपणारा आणि पाताळयंत्री राजकारण करणारा मुघलांच्या सर्वात बलाढ्य आणि श्रीमंत कालखंडाचे नेतृत्व करणारा बादशाह.. ४१ वर्षे दख्खनेतच घालवणारा एकमेव बादशाह.. मराठ्यांच्या चार पिढ्यांच्या विरोधात हरलेला एकमेव बादशाह.. औरंगजेबाच्या उल्लेखाशिवाय मराठ्यांच्या पराक्रमाचा दरारा सांगणे निव्वळ अशक्य गोष्ट...!

दख्खनेत मोहम्मद आदिल शाह.. आपल्याला औरंगजेब माहितीये, पण या मोहम्मद आदिल. शहाने देखील आपल्या सख्ख्या भावांच्या हत्या केलेल्या.. कशासाठी? गादीसाठी.. प्रचंड व्यसनी.. संशयी, हेकेखोर, मत्सर आणि द्वेष बाळगणारा.. केवळ आपल्या दरबारातील एक सरदार जास्त लोकप्रिय होतोय, म्हणून आपल्याच वजनदार सरदाराच्या रातोरात त्याच्या हातापायात बेड्या ठोकण्याचे आदेश देणारा सुलतान..

गोळकोंड्याचा अब्दुल्ला कुत्बशाह.. शिवछत्रपतींच्या दोस्ताचा, अबुल हसन तानाशाहचा बाप.. कायम दुःखी, त्यातून बाहेर पडायला दारूचा आधार.. मीर जुमला प्रकरण घडण्यामागे जेवढे औरंगजेबाचे धुर्त राजकारण कारणीभूत ठरले, तेवढेच श्रेय याच्या संशयी आणि हेकेखोर स्वभावाला देता येईल. वेल्लोर सोडलं, तर एकाही युद्धात उतरला नाही किंवा विजय मिळवला नाही. जेव्हा हा सारा पसारा पाहतो..

छत्रपतींना समकालीन असणारे हे शासक.. बादशाह, सुलतान.. सत्ताधीश.. या साऱ्यांच्या राजकीय कारकिर्दीकडे पाहतो, महत्त्वाकांक्षा आणि त्याच्या पूर्ततेसाठी घेतलेल्या मेहनतीकडे पाहतो, स्वभावगुण आणि चारित्र्याचा विचार करतो.. तेव्हा प्रत्येक गोष्टीत मराठ्यांचे नेतृत्व करणारे महान सेनानी शिवछत्रपती अधिकच उजवे वाटतात.

शिवछत्रपतींना का मानायचे? कारण ज्या काळात दारू पिणे सर्वसाधारण मानले जायचे, त्या काळात त्यांनी निर्व्यसनी राहणे पसंद केले..

ज्या काळात स्त्रियांना युद्धानंतर शिपायांनी उचलून नेणे, आपल्या घरात आणून बळजबरीने कोंडून ठेवणे हे मर्दाचे भूषण मानले जायचे.. तेव्हा शिवछत्रपती स्त्री आदर करायला शिकवतात. स्त्रियांना प्रशासनात स्वतःच्या बरोबरीचा दर्जा देण्याचे आदर्श कृतीतून घालून देतात..

ज्या काळात भावांना मारणे हा सत्ताप्राप्त करण्याचा सर्वात योग्य पर्याय मानल्या जायचा, त्या काळात भावाच्या हत्येचा बदला घेणारे शिवछत्रपती होते..

ज्या काळात शब्द देऊन दगा करण्याचा प्रघात होता.. त्या काळात शिवछत्रपतींच्या पुढच्या पिढ्यांनी थोरल्या महाराजांच्या शब्दाचे पालन केले.. मग बुंदेलखंडाच्या छत्रसालची मदत असेल किंवा गोळकोंड्याच्या अबुल हसन तानाशाहच्या मदतीसाठी औरंगजेबावर केलेला हल्ला असेल..

ज्या काळात स्त्रिया आणि पुरुष, दोघेही गुलाम म्हणून विकले जात, त्या काळात डच लोकांना हा महान राजा धमकावत होता, ‘जोपर्यंत या प्रदेशावर माझे राज्य आहे तोपर्यंत कोणत्याही स्त्री किंवा पुरुषांची मी गुलाम म्हणून खरेदी विक्री होऊ देणार नाही. तसा करायचा कुणी प्रयत्न केलाच, तर त्याला याचे परिणाम भोगावेच लागतील..’

